**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. अे.डी. कुलकर्णी
उपजिल्हाधिकारी (निवृत्त)
५८७, बुधवार पेठ, पाटील सदन,
जिजामाता बाग, पुणे २ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा ,
जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८/पुणे/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | ७/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्री. अे.डी. कुलकर्णी, पुणे २<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे<br>श्री. चिंतामणी जोशी<br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, मौसमी चौगुले |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २०/४/२००६ |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. जिल्हाधिकारी पुणे यांनी माहिती अधिका-यांची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द |

| | | |
|---|---|---|
| | | करावी. रत्नागिरी जिल्हयात माहिती अधिकारी तलाठी हे व मंडल अधिकारी व तहसीलदार अपिलीय प्राधिकारी आहेत. पुणे जिल्हयात माहिती अधिकारी निवासी नायब तहसीलदार आहेत. अशी तफावत का ? त्यामुळे शेतक-यांना त्यांचे जमिनीसंबंधीत नेमके कोणाकडे अर्ज करावे हे माहीत नाही म्हणून वर्तमानपत्रात माहिती प्रसिध्द करावी.<br>२. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांतील माहिती अधिकारी अपिलीय अधिकारी यांच्यात एकसूत्रीपणा आणणेसाठी काय योजना केली याची माहिती मिळावी. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे आहे :

माहिती अधिका-याची संपूर्ण यादी वृत्तपत्रात प्रसिध्द करणे ही श्री. अे.डी.कुलकर्णी यांची मागणी मान्य करणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. ते रास्त आहे. ही नावे नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर प्रसिध्द केली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याबाबत संपूर्ण राज्यामध्ये एकसूत्रीपणा असावा, असे श्री. कुलकर्णी यांनी सुचविले आहे. हा विषय संबंधित माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी य. कक्षेतील नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २१ /५/२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर, पुणे ४११ ००१.

अपिल क्रमांक : २२/पुणे/२००७
दिनांक :- ०७/०५/२००७

श्री. दिलीप सीताराम औताडे
गल्ली नंबर-१० (बी) सय्यदनगर,
हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे-२८

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठता
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

उत्तरवादी

जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिलीप सीताराम औताडे यांनी ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ यांच्या आस्थापनेतील चतुर्थश्रेणी कामगार - कर्मचारी यांची ऑगस्ट २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीतील माहिती दि. २.१२.२००५ च्या अर्जान्वये मागितली होती. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची एकूण संख्या, ऑगस्ट २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीमधील हजेरी पत्रक व वेतन काढल्याचे वितरणपत्र, रजा अथवा गैरहजेरीमुळे केलेली पगारातील कपात याबाबतची माहिती त्याना हवी होती. ही माहिती दि. २.१.२००६

पर्यंत देणेत येईल, असे पत्र जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १३.१२.२००५ रोजी त्याना पाठविले. दि. २.१.२००६ रोजी एकूण कर्मचारी, त्यातील बदली व कायम कामगार अशी माहिती दिली. परंतु अन्य माहिती 'विस्तृत प्रमाणात असल्यामुळे सदरची माहिती आपणास कार्यालयात उपलब्ध करुन दिली जाईल,' असे कळविले. ही माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन श्री. औताडे यानी दि. ६.१.२००६ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. तपशीलवार माहिती द्यावी की नाही याबाबत राज्य माहिती अधिकारी, मुंबई यांच्याकडे 'मार्गदर्शन' मागितल्याचे व ते मिळाल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल असे त्यांनी दि. ३.२.२००६ रोजी श्री. औताडे याना पत्राव्दारे कळविले. त्याच बरोबर 'महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुलै २००५ च्या चाप्टर २ नियम क्रमांक ८ (जे) नुसार कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक माहिती पुरविण्यास जर मोठया प्रमाणातील सामाजिक हिताची गुंतवणूक असेल तरच माहिती पुरविता येते. आपल्या अर्जावरुन अशा प्रकारचे कोणत्याही सामाजिक हिताची गुंतवणूक आहे असे दिसून येत नाही. यास्तव आपण मागितलेली माहिती आपणास पुरविता येत नाही', असेही नमूद केले. माहिती न देण्यासाठी 'वैयक्तिक माहिती' याचा सोयीस्कर अर्थ अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लावला, हे यावरुन स्पष्ट होते. ससून रुग्णालयासारख्या सार्वजनिक इस्पितळातील कामगार-कर्मचाऱ्यांची हजेरी वगैरे माहिती खाजगी ठरु शकत नाही. माहिती देण्याबाबतची आस्थापनेची अनास्थाच या सर्वात दिसून येते.

अपुरी व अयोग्य माहिती मिळाल्यामुळे श्री. औताडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.५.२००६ रोजी केलेल्या अपिलाची सुनावणी दि. ७.५.२००७ रोजी घेतली. अपीलकर्ता श्री. दिलीप सीताराम औताडे, जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे डॉ. उल्हास शंकरराव जाधव हे उपस्थित होते. अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय उपस्थित नव्हते. डॉ.जाधव यांनी माहिती देण्यात झालेल्या विलंबाची कारणे सांगण्याचा प्रयत्न केला. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या हजेरी व वेतनाबाबत ससूनमध्ये भ्रष्टाचार आहे, कामावर नसलेल्या कामगारांची हजेरी दाखविली जाते, त्यांच्या नावावर घेतले गेले वेतन त्यांना दिले जात नाही, हे या माहितीव्दारे उघड होईल, असे प्रतिपादन श्री. औताडे यानी केले. डॉ. जाधव यानी त्याचे खंडन केले.

भ्रष्टाचार असणे-नसणे, तो उघड होणे-न होणे ही बाब अलाहिदा. परंतु मागितलेली माहिती मुदतीत दिली गेलीच पाहिजे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रारंभीचा काळ, प्रशिक्षणाचा अभाव आदीमुळे विलंब झाल्याचे मान्य केले तरी अर्जदाराला झालेला त्रास लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अर्जदाराला हवी असलेली संपूर्ण माहिती दि. १५.५.२००७ पर्यंत द्यावी. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारु नये.

२. यापूर्वी स्वीकारलेले शुल्क अर्जदाराला झालेल्या त्रासाबद्दल प्रतिकात्मक भरपाई म्हणून ससून आस्थापनेने परत करावे.

३. दि. १६.५.२००६ रोजी वरील आदेशाच्या पूर्ततेचा अहवाल अपीलकर्त्याच्या पोच पत्रासह राज्य माहिती आयोगाला सादर करावा.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- ०७/०५/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,पुणे.१

श्रीमती मीना सुभाष कलगुटकर
फ्लॅट नं.४, माधव मॅनार,
३४, गुरुराज सोसायटी,पौड रोड,
कोथरुड, पुणे-३८

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
विभाग नियंत्रक,रा.प.मंडळ, पुणे
श्री.पी.पी.निमसरकार ,

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा ,
विभागीय लेखा अधिकारी,
श्री. एम.व्ही. गोखले
रा.प.मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्रीमती मीना सुभाष कलगुटकर, कोथरुड,पुणे ३८<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,रा.प.मंडळ, पुणे<br>श्री.पी.पी.निमसरकार<br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>विभागीय लेखा अधिकारी, रा.प.मंडळ,<br>श्री. एम.व्ही. गोखले, पुणे |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४/११/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/१२/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९/१२/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/३/२००७ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. वैद्यकीय देयकातील नामंजूर केलेली रक्कम कोणत्या नियमानुसार केली, याचा तपशील.<br>२. राज्य परिवहन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयात अपिलीय प्राधिकारी नमूद करणारा फलक लावलेला नाही. |

## विवेचन

श्रीमती मीना सुभाष कलगुटकर या अपंग स्त्री कर्मचारी असून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात विभागीय कार्यालय, पुणे येथे सेवेत आहेत. नोव्हेंबर २००२ मध्ये त्यांच्यावर एक मोठी शस्त्रक्रिया झाली. या शस्त्रक्रियेसाठी रु. ३,३०,६७८/- खर्च आला. या रकमेपैकी ५०,०४४/- एवढी रक्कम वैद्यकीय खर्चापोटी मंजूर करण्यात आली. त्यातील ४३,०३६/- त्यांना देण्यात आले व उरलेले रु. ७००८/- वारंवार पत्र व्यवहार करुनही मिळालेले नाहीत. वैद्यकीय देयक मंजूर करण्यात आल्याचे त्यांना कळविण्यात आले तरी कोणती रक्कम नियमातील कोणत्या तरतुदीनुसार मंजूर व नामंजूर करण्यात आली याची माहिती श्रीमती कलगुटकर यांनी दि. १४/११/२००६ रोजी जन माहिती अधिका-यांकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे यांनी दि. ७/१२/२००६ रोजी कलगुटकर यांना उत्तर पाठविले. 'आपले वैद्यकीय बिल सर्व कागदपत्रांसह न्यायालयीन कामासाठी मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देता येत नाही,' असे त्यांना कळविले. ' परत मागणी का करण्यात येते समजत नाही,' 'शासकीय दराची सूची संबधितांकडून मागवून घ्यावी' अशा स्वरुपाचे माहिती न देण्याच्या वृत्तीचे निदर्शक शेरे या पत्रात आहेत. त्यावर श्रीमती कलगुटकर यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे यांच्याकडे अपील केले. या अपिलाची सुनावणी झाली नाही.

श्रीमती कलगुटकर यांना हवी असलेली माहिती न देण्यात व त्यांच्या अपिलांची दखल न घेण्यात अक्षम्य चूक झालेली आहे, अशी कबुली प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक श्री. पी.पी.निमसरकार यांनी दि. ८/५/२००७ रोजी माझ्यापुढे झालेल्या सुनावणीच्या प्रारंभीच दिली. कायद्याची पुरेशी माहिती नसल्याने प्रारंभीच्या काळात झालेली ही चूक आहे, या पुढे माहिती देण्याबाबत अथवा अपिलाच्या सुनावणीबाबत विलंब होणार नाही, अशी हमी त्यांनी विनंतीपूर्वक

दिली. श्री. पी.पी.निमसरकार, विभाग नियंत्रक व श्री. एम.व्ही.गोखले, विभागीय लेखा अधिकारी यांनी आपण ही जबाबदारी स्वीकारल्यापासून श्रीमती कलगुटकर यांच्या व अन्य कर्मचा-यांच्या प्रश्नांबाबत सहकार्याची भूमिका घेतली आहे, असे प्रतिपादन केले.

'श्रीमती कलगुटकर यांचे वैद्यकीय बिल मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचेकडून मंजुरी आलेनंतर योग्य ती पडताळणी होऊन श्रीमती कलगुटकर यांना अदा केलेले आहे' असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

श्रीमती कलगुटकर प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित नव्हत्या. परंतु प्रश्न सोडविण्याबाबत श्री. पी.पी. निमसरकार व श्री. एम.व्ही. गोखले या अधिका-यांचे सहकार्य मिळत असल्याचे श्रीमती कलगुटकर यांचे प्रतिनिधी श्री. सुभाष कलगुटकर यांनी सुनावणीच्या दरम्यान मान्य केले.

वैद्यकीय देयकाबाबतची मंजुरी, त्या संबंधीचे परिपत्रक आदि माहिती तीन दिवसांत देण्याचे श्री पी.पी. निमसरकार व श्री. एम.व्ही. गोखले यांनी मान्य केले. तसेच श्रीमती कलगुटकर यांचा प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत पूर्ण सहकार्य केले जाईल, असे त्यांनी नमूद केले. प्रश्न मार्गी लागत असल्यामुळे आपले समाधान होत असून शास्तीची अथवा अन्य कोणत्याही कार्यवाहीची आपली मागणी नाही, असे श्री. सुभाष कलगुटकर यांनी स्पष्ट केले.

माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत जनमाहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांचे नामफलक आता लावण्यात आले आहेत, असे अधिका-यांनी सांगितले.

वरील बाबी लक्षात घेऊन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. श्रीमती कलगुटकर यांना हवी असलेली माहिती तीन दिवसात द्यावी. तसे केल्याचे आयोगाला कळवावे.

३. मागितलेली माहिती देण्याबाबत नकारात्मक भूमिका घेणा-या तत्कालीन जन माहिती अधिका-यास कडक समज देण्यात आहे. तसेच अपिलीय अधिका-यांनाही त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देण्यात येत आहे. विभाग नियंत्रक श्री. पी.पी.निमसरकार यांनी संबधितांना हे लेखी विदित करुन आयोगास त्याची प्रत पाठवावी.

पुणे
दिनांक :- २१/०५/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

आवक क्र- 186/07
दि. 28/5/07

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. सुनिल धोंडीबा शेजाळ — अपीलकर्ता
ए-५, जावळे कॉम्प्लेक्स, वडगाव शेरी,
पुणे-१४

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहसंचालक, आरोग्य सेवा
(आरोग्य), पुणे
डॉ. बी. पी. गायकवाड

जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे १
श्री. माणिकराव किसनराव शेळके

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८.५.२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्री. सुनिल धोंडीबा शेजाळ, ए-५, जावळे कॉम्प्लेक्स, वडगाव शेरी, पुणे-१४<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा,पुणे १ श्री. माणिकराव किसनराव शेळके |

| | | |
|---|---|---|
| | | अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक, आरोग्य सेवा,(आरोग्य ) पुणे १<br>डॉ. बी. पी. गायकवाड |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००६ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | आरोग्य विभागाचे वतीने वरिष्ठ लिपिक पदाकरिता दि. ३.९.२००६ रोजी झालेल्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रत्यक्ष मुलाखतीस बोलाविण्यात आलेल्या पात्र उमेदवारांचे व परीक्षा आसन क्रमांक १८०० या उमेदवाराचे उत्तर पत्रिका व गुण पत्रिकांच्या सत्यप्रती |

## विवेचन

श्री. सुनिल धोंडिबा शेजाळ यांनी आरोग्य सेवा संचालनालय, पुणे कार्यालयाकडे वरिष्ठ लिपिक पदाकरिता दि. ३.९.२००६ रोजी झालेल्या परीक्षेतील उमेदवारांच्या संदर्भात माहिती मागितली होती. लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी बोलाविलेले पात्र उमेदवार व आसन क्रमांक १८०० या उमेदवाराच्या उत्तर पत्रिका व गुणपत्रिका यांच्या सत्य प्रती त्यांनी मागितल्या होत्या. ही माहिती आपल्या कार्यालयाकडे नसल्यामुळे संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या कार्यालयाकडे माहिती मागितली असून ती प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी श्री. शेजाळ यांना कळविले. परंतु मूळ अर्ज (दि. ९.११.२००६) करुन ५५ दिवस उलटल्यानंतरही माहिती न मिळाल्याने श्री. शेजाळ यांनी दि. २४.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. त्यांनी दि. ४.१.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. त्यावर जन माहिती अधिका-यांनी दि. १०.१.२००७ रोजी संचालक, आरोग्यसेवा यांच्याकडे पुन्हा माहिती मागितली. परंतु आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे आपण संबंधित माहिती पुरवू शकलो नाही, असे निवेदन जन माहिती अधिका-यानी सुनावणीच्या वेळी सादर केले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मुदतीत माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिका-यानी पाळलेले नाही. परंतु त्याला आरोग्य संचालक कार्यालय जबाबदार आहे, हे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. त्याबाबत आरोग्य संचालकांना समज देण्यात येत आहे.

आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

अर्जदारास संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करु द्यावे व त्यातील हव्या त्या प्रती अर्जदारास दि. १५.५.२००७ पर्यंत द्याव्यात. पूर्तता अहवाल राज्य माहिती आयोगाकडे पाठवावा.

(सुनावणीच्या वेळीच वरील आदेश दिलेला आहे. )

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग पुणे.**

**पुणे**
**दिनांक : २८ /५/२००७**

जावक क्र. 185/07
दि. 28/5/07

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. दिलीप बाबुराव लिंबळे
१७.अ, कर्वे रोड, एरंडवणा, — अपीलकर्ता
पुणे ४.

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी
श्री. चिंतामणी जोशी

जन माहिती अधिकारी तथा ,
जिल्हाधिकारी, पुणे यांचे चिटणीस
श्री. दादाभाऊ जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्री. दिलीप बाबुराव लिंबळे<br>१७,अ, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे<br>श्री. चिंतामणी जोशी<br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे चिटणीस, श्री. दादाभाऊ जोशी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ८.९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १६.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २९.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २७.१२.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | दखखन पाटबंधारे मंडळ (मध्य ) सहकारी गृहरचना संस्था आणि तिचे पदाधिकारी यांचे विरोधात श्री. रमेश राजाराम तुंगारे यांनी केलेल्या केलेल्या तक्रारी अर्जांची माहिती |

## विवेचन

दखखन पाटबंधारे मंडळ (मध्य ) सहकारी गृहरचना संस्था आणि तिचे पदाधिकारी यांचे विरोधात श्री. रमेश राजाराम तुंगारे यांनी केलेल्या अर्जाबाबत श्री. दिलीप बाबुराव लिंबळे यांनी माहिती मागितली होती. दखखन पाटबंधारे मंडळ (मध्य) सहकारी गृहरचना संस्था नोव्हेंबर २००० मध्ये विसर्जित झाली आहे. त्यानंतर दि. २१.११.२००० पासून नवीन पंजीकृत झालेल्या दखखन पाटबंधारे मंडळ, त्रिवेणी/प्रतापगड/सप्तरंग /निलगिरी/ सिंचननगर सहकारी गृहरचना संस्था व तिचे पदाधिकारी सभासद यांचेविरुध्द श्री. तुंगारे यांनी केलेले तक्रार अर्ज व त्या अनुषंगाने कार्यालयीन टिपणी, सादर केलेला चौकशी अहवाल व रमेश तुंगारे यांना दिलेली उत्तरे या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती, दि. २१.११.२००० पासून आजतागायत या कालावधीमध्ये सदनिका भाडयाने दिल्यासंदर्भात दखखन पाटबंधारे मंडळ, त्रिवेणी /प्रतापगड/सप्तरंग /निलगिरी/ सिंचननगर सहकारी गृहरचना संस्थांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केलेल्या माहितीपत्राच्या छायाप्रती, या गृहरचना संस्थांमध्ये सदनिकांचे हस्तांतरणास मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीचा तपशील, भाडयाने दिलेल्या सदनिकांबाबत अधिमूल्य भरण्याची जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे केलेल्या अर्जांचा तपशील अशी माहिती त्यांना अपेक्षित होती. ही माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे उपलब्ध कागदपत्रांची पहाणी करावी, त्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले, त्याच बरोबर दि. १६.९.२००६ व दि. ३०.९.२००६ रोजी काही माहिती पुरविली. त्याविरुध्द श्री. लिंबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,

पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते फेटाळले, त्याविरुध्द श्री. लिंबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील करुन हव्या असलेल्या माहितीचा तपशील दिला आहे.

श्री. रमेश तुंगारे व श्री. दिलीप बाबुराव लिंबळे हे परस्परांच्या वादात या प्रकारची माहिती मागणारे अर्ज सातत्याने करीत आहेत, असे सुनावणीत स्पष्ट झाले. तसेच श्री. लिंबळे यांनी मूळ अर्जात केलेल्या मागणीपेक्षा अपिलामध्ये अधिक बाबींच्या माहितीची मागणी केली असल्याचे उत्तरवादीने निदर्शनास आणले. त्यात तथ्य आहे. मात्र त्यातील शक्य तेवढी माहिती देण्याचा प्रयत्न आपण केल्याचे प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. चिंतामणी जोशी यांनी नमूद केले. कागदपत्रांवरुन ते स्पष्ट होते.

दोन व्यक्तींमधील वादासाठी माहितीचा अधिकार कायद्याचा उपयोग करुन सातत्याने शासकीय यंत्रणेकडून विस्तृत प्रमाणात माहिती मागितली जाते. या माहितीच्या संकलनासाठी बरीच यंत्रणा राबवावी लागते, असेही उत्तरवादीचे म्हणणे आहे.

एकूण प्रश्नाचा विचार करुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अशंत: मान्य.

२. मूळ अर्जात मागितलेल्या माहितीपैकी राहिलेली माहिती श्री. लिंबळे यांना एक आठवडयात द्यावी व तसा पूर्तताअहवाल आयोगाकडे पाठवावा.

**पुणे**
**दिनांक : २४ /५/२००७.**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग पुणे.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजल
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. विनायक सदाशिव गोखले
२८६/८७, नारायण पेठ, पुणे.३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अधिक्षक,भूमि अभिलेख, पुणे — उत्तरवादी
श्री. गिरीश राव

जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्र.१ पुणे
श्री. संजय निरभवणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्री. विनायक सदाशिव गोखले, २८६/८७, नारायण पेठ, पुणे३० **अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,भूमि अभिलेख, पुणे श्री. गिरीश राव **जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, क्र.१, पुणे श्री. संजय निरभवणे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.५.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.५.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००६ |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | कै. यमुनाबाई सदाशिव गोखले हयांनी सि.स.नं. २८६/८७ नारायण पेठ, पुणे येथील जागा एकत्रिकरण करताना दिलेल्या जबाबाची प्रत. तसेच न. भू. क्र. २८६/८७ ची स्वयंसुची धारिका अभिलेखात सापडत नसलेने, का सापडत नाही व संबंधित कर्मचा-यावर कोणती कार्यवाही करणेत आली व केली नसल्यास का करणेत आली नाही, याची माहिती |

## विवेचन

कै. यमुनाबाई सदाशिव गोखले यांच्या जबाबाची प्रत व नगर भूमापन क्र. २८६/८७ ची स्यंयसूचि धारिका सापडली किंवा नाही याबाबतची माहिती श्री विनायक सदाशिव गोखले यांनी मागितली. सदरची धारिका अभिलेखात सापडत नसल्याचे व 'ती कोणत्या कर्मचा-याकडून गहाळ झाली याबाबतची माहिती आढळत नसल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही,' असे नगर भूमापन अधिका-यानी दि. २०.५.२००६ रोजी श्री. गोखले यांना कळविले होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, श्री. गिरीश राव यांनी केलेल्या सुनावणीतही ही परिस्थिती नमूद केली आहे. एकाच शे-याव ही धारिका वरिष्ठांच्या (उपसंचालक ) कार्यालयात सादर केल्याची शक्यता गृहीत धरुन शोध घेत . परंतु तेथेही ही धारिका मिळाली नाही, असे प्रथम अपिलाच्या सुनावणीत नगर भूमापन अधिकारी यांनी नमूद केले आहे. दि. २६.५.२००६ च्या अपिलाची सुनावणी दि. ६.६.२००६ ते २१.८.२००६ रोजी झाली व अपिलीय प्राधिका-यानी दि. २०.११.२००६ रोजी निर्णय दिला. 'प्रस्तुत प्रकरणी दिनांक ६.६.२००६ ही प्रथम सुनावणी तारीख नेमून वेळोवेळी सुनावणी घेणेत आली आहे. सुनावणी दरम्यान जाबदार यांना कागदपत्रांचा पुन्हा शोध घ्यावा अशा दि. १८.७.२००६ रोजी सूचना देणेत आल्या होत्या,' असे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशात नमूद केले आहे. 'अपीलदाराचे दिर्घकाळाचे मागणीचे अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी क्र.१ यांनी विशेष कर्मचारी या कामासाठी काही कालावधीसाठी नेमून आवश्यक कागदपत्रांचा फेरशोध घ्यावा त्याकरिता घालकाढी रजिस्टर वरुन पडताळणी करुन जरुर तर सर्व

संबंधित कार्यालयात शोध घ्यावा व अपीलदारांस आवश्यक कागदपत्रे पुरवावीत,' अशा सूचना अपिलीय प्राधिका-यांनी दिल्याचे त्यांच्या आदेशात नमूद केले आहे. या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत परिरक्षक भूमापक श्री. व्ही.डी. जगताप यांना सूचना देण्यात आल्या, असे जन माहिती अधिका-यांनी व अपिलीय प्राधिका-यानी द्वितीय अपिलाच्या सुनावणीत सांगितले. प्रथम अपिलीय प्राधिका-याच्या आदेशानुसार दोन महिन्याच्या मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून श्री. गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

'कार्यालयातील अभिलेख कक्षात शोध घेतला असता, स्वयंसूची धारिकेत आवश्यक ती कागदपत्रे आढळ झाली नाहीत, त्यामुळे त्यांनी अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे व उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालयात स्वतः शोध घेतला. त्यावेळी त्यांचे समवेत अर्जदार स्वतः हजर होते. परंतु त्यांना स्वयंसूची धारिका उपलब्ध झाली नाही. धारिका उपलब्ध नसलेची त्यावेळी त्यांची पूर्ण खात्री झालेली आहे,' असे माझ्यासमोरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी त्याला दुजोरा दिला. आपण सातत्याने कागदपत्र मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले, असे श्री. राव यांनी यावेळी सांगितले. धारिका उपलब्ध होत नसल्याचे शेवटचे पत्र जन माहिती अधिका-यानी दि. ३०.३.२००७ रोजी श्री. गोखले यांना पाठविले आहे. आपल्याला काही कागदपत्र पाहण्यास बरोबर नेले होते. परंतु आवश्यक ती धारिका पाहण्यास अद्यापही मिळाली नाही, असे श्री. गोखले यांनी यावेळी सांगितले. 'नारायण पेठ, पुणे येथील सि.स.नं. २८६/८७ चे एकत्रीकरण करताना आपली आई कै. यमुनाबाई सदाशिव गोखले यांनी दिलेल्या जबाबाची प्रत आपल्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. कारण नगर भूमापन कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीत व इतर कागदपत्रांमधील आपल्या आईची सही बनावट आहे. जबाबामधील सहीच्या आधाराने ते सिध्द करता येईल. परंतु ते सिध्द होऊ नये, यासाठीच ही धारिका व जबाबाची प्रत उपलब्ध करुन दिली जात नाही,' असा दावा श्री. गोखले यांनी केला. सन १९९३ सालापासून श्री. गोखले ही कागदपत्र मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रकरणी कर्मचा-यानी संगनमताने गैरकारवाई करुन कागदपत्रे गहाळ केली का व त्यामुळे अपीलकर्त्याच्या हक्काला बाधा आली का, असा यातील मुख्य विषय आहे. त्याचे निर्णायक उत्तर मिळण्याच्या दृष्टीने श्री. गोखले यांनी मागितलेली माहिती महत्वाची आहे. त्यांच्य वतीने या प्रकरणी न्यायालयात चालू असलेल्या प्रक्रियेतही ही माहिती महत्वाची आहे.

जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, क्र.१, पुणे श्री. संजय निरभवणे व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे श्री. गिरीश राव यांनी 'आपण कसोशीने व पुरेसे प्रयत्न करुनही ही माहिती मिळू शकली नाही, असे सुनावणीदरम्यान नमूद केले. संबंधित कागदपत्रे उपलब्ध न होण्याची बाब त्यानी पद ग्रहण करण्याच्या पूर्वी अनेक वर्षांपासून चालत आली आहे. त्यामुळे त्या त्या काळात ही कागदपत्रे ज्यांच्या अधिकारात ताब्यात असतील त्या सर्वांना ती गहाळ होण्याबद्दल जबाबदार धरावे लागेल.

वरील पार्श्वभूमीवरुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

<u>आदेश</u>

१. अपील मान्य.

२. नगर भूमापन अधिकारी व अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी दि. १० जूनपर्यंत धारिका शाधून उपलब्ध करुन द्यावी. दरम्यानच्या काळात धारिका ताब्यात असणा-या पूर्वीच्या कर्मचारी/अधिका-यांचे नाव, पत्ता इ. तपशीलवार यादी तयार करावी व दि. १५.६.२००७ पर्यंत कै. यमुनाबाई सदाशिव गोखले यांच्या जबाबाची प्रत व संबंधित धारिका उपलब्ध न झाल्यास या कर्मचारी/अधिका-यांविरुध्द सरकारी मालमत्ता गहाळ केल्याच्या प्रकरणी पोलिसांकडे गुन्हा नोंदवावा. त्या दृष्टीने संबंधितांना या संभाव्य कारवाईची पूर्व कल्पना दि. ३० मे २००७ पर्यंत द्यावी.

पुणे
दिनांक :- २४ /५/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

R.P.A.D.

20

# फॅक्स संदेश

प्रति,

मा. कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०32

२०१७
१७/३/०७

क्र.केमाअ/अपील/३१८७/०७

28 फरवरी 2007
सांगली दि.२७.२.०७

संदर्भ :- आपणाकडील क्र.अपील/२००७/८९६/०२ दि.१७.२.०७

विषय :- अपिल सुनावणी बाबत....

---o---

सादर करण्यात येते की, वरील संदर्भित पत्र इकडील कार्यालयास दि.२६.२.०७ रोजी प्राप्त झाले असल्याने, दि.२३.२.०७ रोजी अपिल सुनावणी कामी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयात हजर राहता आले नाही.

वरील संदर्भा बाबतचे या पुर्वी श्री अरविंद नामदेव शिंदे रा.सांगली यांनी केले अपिल अर्ज दि.१०.४.०६ चे संदर्भात आपणाकडून दि.२९.८.०६ रोजी अपिल सुणावणी ठेवण्यात आली होती.त्यावेळी संबधीत अर्जदार श्री अरविंद नामदेव शिंदे रा.सांगली यांनी माहिती अधिकार-२००५ अंतर्गत माहिती अधिकारान्वये मागीतलेली माहिती मिळाले बाबत तसेच दि.२१.२.०६ रोजीच्या अपिलीय अर्जाबाबतची माहिती मिळाली असल्याने वरील संदर्भाने दाखल केलेले अपिल निकाली काढणेस विनंती केली आहे.तसेच यापुर्वी केलेले सर्व अपिल निकाली काढणेबाबत मा.राज्य माहिती आयोग,मुंबई यांना कळविणेबाबत विनंती अर्ज इकडील कार्यालयास केलेला होता,त्याचे विनंती प्रमाणे अपिल निकाली काढणेबाबत इकडील कार्यालयीन पत्र क्र केमाअ/१३६०/०६ दि.२५.८.०६ अन्वये फॅक्सव्द्वारे तसेच दुरध्वनीव्द्वारे आपणास विनंती करण्यात आली आहे.सदर पत्राची छायांकित प्रत,श्री अरविंद नामदेव शिंदे यांचे अर्जाची प्रत सादर केली आहे.तरी केले विनंती प्रमाणे सदर अपिल निकाली काढणेस विनंती आहे.

(सुनिल कोल्हे)
**अपर पोलीस अधीक्षक सांगली**

अपील (सांगली)

मुक अपीलला बवावे

प्रस्त सविनय सादर:-
२९/३/२००७

मा. आ

मा.राज्य माहिती आयोग,
विभागीय आयुक्त कौन्सिल हॉल,पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय रमाकांत सवाई
९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी — अपीलकर्ता
पुणे-३०

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,विकास योजना, — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका
सौ.हर्षदा वि.शिंदे

जन माहिती अधिकारी तथा ,
सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण क्र.२
पुणे महानगरपालिका
श्री. श्रीधर विष्णू येवलेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय रमाकांत सवाई, ९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी, पुणे-३०<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>सहाय्यक अभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, सौ.हर्षदा वि.शिंदे<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण क्र.२, पुणे महानगरपालिका |
| ३ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. राज्याचे मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांच्यापुढे दि. २७.३.२००६ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | आदेशाप्रमाणे समाधान न झाल्यामुळे पून्हा केलेले अपील.<br>२. सत्संग सहकारी गृहरचना संथा मर्यादित या संस्थेच्या संदर्भातील सुधारित ले-आऊटचा तपशील, सद्यस्थितीचा माहिती. |

## विवेचन

श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई यांनी 'सत्संग सोसायटी या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' या संस्थेच्या संदर्भात जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने महापालिकेने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही. प्रथम अपिलातही त्यांना समाधानकारक माहिती मिळालेली नाही. या संदर्भात श्री.सवाई यांनी यापूर्वी दि. २३.१.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाची सुनावणी मुख्य माहिती आयुक्त, डॉ. सुरेश जोशी यांच्यापुढे झाली होती. श्री. सवाई हे कुलमुखत्यारपत्रधारक आहेत. 'या संस्थेतील दोन भूखंडांच्या संदर्भात जिल्हा न्यायालयाने व उच्च न्याया[illegible] दिलेल्या आदेशाची सांगड घालून महापालिकेला कार्यवाही करावी लागणार आहे,' असे महापालिकेच्या वतीने त्यावेळी सांगितले होते. 'नगर अभियंता यांच्याकडील अपिलाची सुनावणी दि. २३.३.२००६ रोजी मुक्रर केली आहे. सुनावणी होईल तेव्हा या सर्व बाबींचा विचार करुन निर्णय दिला जाईल,' असे महापालिकेच्यावतीने तेव्हा सांगितले होते. ती भूमिका मान्य करुन डॉ. जोशी यांनी, 'नगर अभियंता यांच्याकडील निर्णयाने समाधान न झाल्यास आयोगाकडे पुन्हा अपील करता येईल', असा निर्णय दिला होता.

वर नमूद केल्याप्रमाणे सुनावणी झाली. परंतु माहिती आयोगापुढे मांडलेल्या भूमिकेव्यतिरिक्त काहीही निष्पन्न झालेले नाही, असे श्री. सवाई यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्याची सुनावणी दि. ७.५.२००७ रोजी घेतली, तेव्हा जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांध[illegible] नियंत्रण क्र.२, पुणे महानगरपालिका व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता हे दोघेही उपस्थित नव्हते. त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळेपुरते हे मान्य करण्यात आले असले तरी अशी अनुपस्थिती योग्य नाही व यापुढे अशी अनुपस्थिती मान्य करता येणार नाही, या अधिका-यांनी स्वत: उपस्थित राहिले पाहिजे, याची स्पष्ट जाणीव उपस्थित अधिका-यांना व त्यांच्यामार्फत वरील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

सत्संग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित कडील दोन भूखंड धारक आणि कुलमुखत्यारपत्रधारक श्री. सवाई यांचा न्यायालयातील वाद हा यातील मुख्य प्रश्न आहे. जिल्हा न्यायालयाने दि. ३०.९.२००४ रोजी दिलेल्या निकालानंतर महापालिकेने ६० दिवसात विहित नमुन्यात कळविणे आवश्यक होते, ते कळविलेले नाही. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ नगर अभियंता यांनी प्रत्येक सुनावणीत दिला असला तरी माहिती देण्यात त्याचा

नेमका कोणता अडसर आहे, हे पालिकेच्या प्रतिनिधीना स्पष्ट करता आले नाही. प्रत्यक्ष माहितीपेक्षा संस्थेने दाखल केलेल्या दुरुस्त लेआऊटला मान्यता मिळणे ही श्री. सवाई यांची मुख्य मागणी आहे. न्यायालयाच्या आदेशावर कार्यवाही करणे अथवा अशा स्वरुपाची मान्यता देणे, न देणे हा स्वतंत्र मुद्दा आहे. परंतू त्या अनुषंगाने अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती मिळणे हा त्याचा हक्क आहे.

सत्संग सहकारी गृहनिर्माण संस्थेचा हा प्रश्न २० वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहे. त्यातही गेल्या सुमारे १३ वर्षांपासून संस्था व दोन भूखंडधारक श्रीमती गद्रे व श्रीमती बर्वे यांच्यामध्ये वाद चालू असून न्यायालयात दावे/प्रतिदावे होत आले आहेत. संस्थेच्या दुरुस्त लेऑऊटचा प्रस्ताव सादर केला आहे, परंतु महानगरपालिकेने त्याला मान्यता दिलेली नाही.

या सर्व विषयातील तपशील, गुंतागुंत व दावे-प्रतिदावे लक्षात घेता संस्थेला म्हणजेच कुलमुखत्यारपत्रधारक असलेले श्री. सवाई यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीबाबत महापालिकेच्या बांधकाम विभागाने निःसंदिग्धता ठेवून पारदर्शकतेने कृती करणे आवश्यक आहे. श्री. सवाई यांनी दुरुस्त लेआऊटच्या मान्यतेसंदर्भात आवश्यक असलेली सर्व कागदपत्र सादर केलेली नाहीत, असे महापालिकेच्या उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले, तर सर्व बाबींची पूर्तता केल्याचे श्री. सवाई यांचे म्हणणे आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. श्री. सवाई यांच्याकडून (संस्थेकडून) महानगरपालिकेला नेमकी कोणती पूर्तता आवश्यक आहे याच्या तपशिलाबद्दल पुर्ण माहिती देणारे पत्र सुनावणीच्या दिवशी दि. ७.५.२००७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत त्यांना द्यावे. त्याच्या पूर्ततेबाबत श्री. सवाई यांनी दि. १५.५.२००७ पर्यत उत्तर पाठवावे. श्री. सवाई, आवश्यक असल्यास संस्थेचे अन्य प्रतिनिधी व महानगरपालिकेचे संबंधित वरिष्ठ अधिकारी यांची संयुक्त चर्चा दि. २०.५.२००७ पर्यंत व्हावी आणि उभयमान्य निर्णय दि. २५.५.२००७ पर्यंत होऊन त्याबाबतची फलनिष्पत्ती आयोगाला दिनांक २६.५.२००७ पर्यंत संयुक्तपणे कळवावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**पुणे**
**दिनांक : २१ /५/२००७.**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग पुणे.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१
अपील क्रमांक : ९५८/पुणे/२००७
९५९/पुणे/२००७
सुनावणी दिनांक :- १८/४/२००७

श्री. बाळकृष्ण दशरथ लिंभोरे
मु. पो. हिवरे, ता. पुरंधर, जि. पुणे

श्री. लालासाहेब राजाराम जाधव — अपीलकर्ता
शिंदे वायरमन् चाळ, साठेनगर,
लोहगांव, पुणे- ४११०४७

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी
(माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा(प्रभारी)मुख्याध्यापक,
कै.आबासाहेब गोसावी माध्यमिक विद्यालय,
वडगांवशिंदे, ता.हवेली, जि. पुणे

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण दशरथ लिंभोरे व श्री. लालासाहेब राजाराम जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक कै. आबासाहेब गोसावी माध्यमिक विद्यालय,

वडगांवशिंदे, ता. हवेली, जि.पुणे यांच्याकडे विद्यालयाच्या संदर्भातील माहिती मागणारे स्वतंत्र अर्ज अनुक्रमे दि. ९.१.२००६ व दि. १७.१.२००६ रोजी केले होते. मुख्याध्यापकांनी माहिती नाकारली किंवा पुरेशी माहिती दिली नाही. तसेच अपुरी व चुकीची माहिती दिली, या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ यांच्याकडे अनुक्रमे दि. २.२.२००६ व दि. ३१.१.२००६ रोजी अपील दाखल केले. त्यांनी आदेश देऊनही माहिती मिळाली नाही, म्हणून दोघांनीही दि. १२.४.०६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दि. १८.४.२००७ रोजी झाली. त्यावेळी अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण दशरथ लिंभोरे व श्री. लालासाहेब राजाराम जाधव, जन माहिती अधिकारी तथा (प्रभारी) मुख्याध्यापक श्री. कल्याण लक्ष्मण बरडे, अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री. प्रकाश परब हे उपस्थित होते.

कै. आबासाहेब गोसावी माध्यमिक विद्यालय ही शाळा जून १९९२ ते दि. ३१.५.१९९७ मध्ये अस्तित्वात असल्याबाबतचे पुरावे, शासनाची मान्यता दर्शविणारे आदेश, १९९७-९८ ते २००५-२००६ पर्यंत विद्यालयाच्या सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजेरीपत्रके, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, कर्मचाऱ्यांना बँकेमार्फत दिलेले जाणारे वेतन, भविष्य निर्वाह निधी या बाबतच्या प्रती अशा स्वरुपाची माहिती दोन्ही अर्जदारांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी श्री. कल्याण लक्ष्मण बरडे यांनी श्री. लिंभोरे व श्री. जाधव यांना दि. २०.१.२००६ रोजी पत्र पाठवून माहिती नाकारली. श्री. लिंभोरे यांना त्यांनी कळविले, "शाळा न्यायाधिकरण, पुणे येथे न्यायालयीन प्रलंबित प्रकरणात आपण शाळेतील अधिकृत शिक्षक नाहीत ही संस्थेने भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे शालेय प्रशासनातील वैयक्तिक माहिती आपणास मागण्याचा कोणताही अधिकृत अधिकार नाही." श्री. जाधव यांना त्यांनी कळविले, "विद्यालयाचा कर्मचारी म्हणून तुमचा व्यक्तिगत कोणताही

संबंध नाही अथवा स्थानिक पातळीवर विद्यालयाशी संबंधित असलेल्या समितीमध्ये सदस्य नसल्याने आपण मागितलेली माहिती ही शाळेची व संस्थेची प्रशासकीय वैयक्तिक बाब आहे. त्यामुळे तुमच्या दि. १७.१.२००६ अर्जाबाबत महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये त्याचे कायदेशीर प्रयोजन दिसत नसल्याने तुमचा मूळ अर्ज या पत्रान्वये परत करण्यात येत आहे."

वरील उत्तर पाहता मुख्याध्यापकांना माहितीचा अधिकार अधिनियमाची कोणतीही माहिती नाही. तसेच त्यांची भूमिका माहिती देण्याची नाही, हे स्पष्ट होते. मूळ अर्जात महाराष्ट्र माहितीचा अधिनियम २००५ चा उल्लेख आहे. परंतु केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आता लागू असून महाराष्ट्राचा कायदा निरस्त झाला आहे, हेही दोघांनाही माहीत नाही.

श्री. लिंभोरे [redacted] आपण या विद्यालयात नोकरीला असलेल्या काळातील सेवाहक्का-विषयी कायदेशीर कारवाईचा मार्ग अवलंबत आहेत, तर श्री. जाधव यांच्या पत्नी सौ. शोभा जाधव यांनी अशा सेवाहक्काबाबत दिवाणी दावा दाखल केला आहे. श्री. लिंभोरे यांचे अपील शाळा न्यायाधिकरण, पुणे यांनी दि. २१.९.२००६ रोजी फेटाळले आहे, याचा मुख्याध्यापकांच्या उत्तरात उल्लेख केला आहे. परंतु सेवाहक्काबाबतचे अपील न्यायाधिकरणाने फेटाळण्याचा माहिती देण्या-न देण्याशी संबंध नाही. त्यामुळे माहिती नाकारण्यासाठी हे कारण समर्थनीय नाही.

मुख्याध्यापकांच्या निर्णयाविरुध्द श्री. लिंभोरे व श्री. जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. दोन्ही अपिलांची त्यांनी दि. १७.२.२००६ रोजी सुनावणी केली. त्यावेळीही(प्रभारी)मुख्याध्यापकांनी माहिती देता येत नसल्याचे संस्थेचे पत्र सादर केले. 'दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी' या संस्थेचे हे विद्यालय आहे. संस्थेचे सचिव श्री. एम.डी. शेवाळे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र

शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना सादर करण्यात आले असून कोणतीही माहिती संस्था देणार नाही, असा त्याचा सारांश आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ती कारणे अमान्य केली व माहिती त्वरित देण्याचा आदेश दिला. वस्तुत: शास्ती लावण्याचा अधिकार प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाही. तरीही त्यांनी श्री. लिंभोरे यांना माहिती देण्यात झालेल्या विलंबाबद्दल (प्रभारी) मुख्याध्यापकांना २०००/- रुपये दंड केला. तसेच 'दंड भरण्याच्या चलनाची प्रत व अर्जदारास माहिती दिल्याची पोच आठ दिवसात सादर न केल्यास आपल्या शाळेस मंजूर करण्यात आलेले अनुदान रोखून ठेवण्यात येईल याची गंभीरतापूर्वक नोंद घ्यावी,' असे नमूद केले. श्री. जाधव यांच्या अपिलावरही शास्ती वगळता या स्वरुपाचा आदेशच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. या आदेशानंतरही आपल्याला माहिती मिळाली नाही, असे पत्र श्री. लिंभोरे व श्री. जाधव यांनी दि. १६.३.२००६ रोजी शिक्षणाधिकाऱ्यांना दिले. त्यानंतरही शिक्षणाधिकाऱ्यांनी संस्थेला सूचना देऊनही माहिती दिली गेली नाही. म्हणून श्री. लिंभोरे व श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.४.०६ रोजी अपील केले.

हा सर्वच विषय अत्यंत गुंतागुंतीचा आहे, असे सुनावणीत पुढे आलेल्या माहितीवरुन स्पष्ट होते. ही माहिती अशी :

उपरोक्त विद्यालय १९८९-९० ला सुरु झाले. परंतु मान्यता नसल्यामुळे ते बंद केले गेले. त्यानंतर १९९७-९८ मध्ये ते विनाअनुदानीत म्हणून पुन्हा सुरु झाले. दरम्यानच्या काळात श्री. गोकुळ रतनगीर गोसावी हे मुख्याध्यापक होते. ते फरारी असून तशी फिर्याद पोलिसांकडे नोंदविलेली आहे. त्या काळातील कागदपत्रे फरारी मुख्याध्यापकांकडे असल्यामुळे आपल्याकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे देता येत नाहीत, असे (प्रभारी) मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे. सप्टेंबर २००६ पासून वेतन व वेतनेतर अनुदान विद्यालयाला मंजूर करण्यात आले. परंतु शिक्षणाधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती न मिळण्यापासून अनेक अनियमिततांमुळे हे अनुदान

रोखून धरलेले आहे. आपण स्वत: विद्यालयात जाऊन आवश्यक अभिलेखांची मागणी केली, त्याबाबत स्मरण दिले, तरीही अभिलेख सादर केले गेले नाहीत. त्यामुळे दि. ३०.३.२००७ पर्यंत प्रतीक्षा करुन अनुदान थांबविण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे शिक्षणाधिकारी श्री. प्रकाश परब यांनी सुनावणी- दरम्यान सांगितले. मुख्याध्यापकांनी ते मान्य केले. कागदपत्रे उपलब्ध आहेत, परंतु ती संस्थेच्या ताब्यात आहेत. संस्था ती देऊ इच्छित नाही. त्यामुळे ती उपलब्ध नसल्याचे खोटे सांगण्यात येत आहे, असे अपिलकर्त्यांचे म्हणणे आहे. [redacted] श्री. बरडे यांना ते मान्य नाही. मात्र असलेली माहिती देण्याबाबतही ते ठामपणे काहीही सांगू शकत नाहीत, असे दिसून आले. ते मुख्याध्यापक आहेत की प्रभारी मुख्याध्यापक आहेत, हेही स्पष्ट नाही. छापील कागदपत्रात त्यांचा उल्लेख 'मुख्याध्यापक' असा आहे, त्यानी स्वत: प्रभारी मुख्याध्यापक असल्याचे म्हटले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेल्या सुनावणीतही श्री. बरडे यांनी आधी माहिती देण्याचे कबूल केले व थोडया वेळाने परत येऊन ते अमान्य केले, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणीच्या इतिवृत्तात नमूद केले आहे. विद्यालयाच्या संदर्भात माहितीबाबत तरी मुख्याध्यापकांना फारसे स्थान नसावे, असे यावरुन दिसते. विद्यालयात नेमका कर्मचारीवर्ग किती आहे, विद्यालय नेमके किती काळ बंद होते व पुन्हा नेमके कधीपासून सुरु झाले, यासारख्या अनेक प्रश्नांची सप्रमाण उत्तरे ते देऊ शकले नाहीत.विद्यालयात आठवी ते दहावीपर्यंतचे वर्ग असून १६२ विद्यार्थीसंख्या आहे. पूर्वी शिक्षकांना दरमहा १५००/- रुपये मानधन/वेतन दिले जात होते. आता ते १०००/- रुपये करण्यात आले आहे, असेही श्री. बरडे यांनी सांगितले. सुनावणीच्या वेळी त्यांनी काही शासकीय परिपत्रकांच्या व इतर काही कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या. परंतु त्या पूर्ण माहिती देणाऱ्या नाहीत, आणि तरीही आवश्यक ती सर्व माहिती दिल्याचा त्यांचा दावा होता. शास्तीच्या संदर्भात जाणीव दिली असता मुळात तुटपुंजे असलेले वेतनही नियमित मिळत नसल्याचे त्यांनी सूचित केले.

'दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी' ही थोर समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेली संस्था. अशा संस्थेच्या विद्यालयात ही स्थिती असावी, हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ४ अन्वये विद्यालयाची माहिती स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे बंधनकारक आहे. परंतु ते न करता मागितल्यावरही माहिती नागरिकांना नाकारली जाते, हे आक्षेपार्ह व माहितीचा अधिकार अधिनियमाच्या विरुध्द आणि म्हणून बेकायदेशीर आहे.

स्वयंस्फूर्तीने माहिती जाहीर करणे व मागितलेली माहिती देणे याच्याशी संबंधित असा हा विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील त्याविषयीच्या तरतुदी स्पष्ट आहेत. जनमाहिती अधिकाऱ्यांचे विद्यालयातील स्थान व त्यानी केलेले निवेदन यांचा विचार करता त्यांच्यापेक्षा विद्यालयाच्या व्यवस्थापनाला या कायदेभंगाबद्दल जबाबदार धरले पाहिजे, असा निष्कर्ष निघतो.

वरील सर्व परिस्थिती लक्षात घेऊन मी पुढील आदेश देत आहे:

## आदेश

१) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांना शास्तीचा अधिकार नसला तरी श्री. लिंभोरे यांच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकाऱ्यांना त्यांनी लावलेली रुपये २०००/- ही शास्ती जणू काही राज्य माहिती आयोगानेच लावली असल्याचे मानून त्यास मान्यता देण्यात येत आहे. शासनाने विहीत केलेल्या लेखाशिर्षाखाली ही रक्कम दि. १०.६.२००७ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी भरावी. तसे आयोगाला सप्रमाण अवगत करावे.

२) नियमानुसार आवश्यक असलेले संस्थेचे सर्व अभिलेख संस्थेच्या सचिवांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे दि. ३०.५.२००७ पर्यंत सादर करावेत. तसेच अर्जदारांना हवी असलेली माहितीही याच मुदतीत द्यावी. असे अभिलेख सादर होईपर्यंत शासनाने

माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम १९ (८)(बी) नुसार कारवाई म्हणून संस्थेचे अनुदान बंदच ठेवावे.

३) अभिलेख, नियमांची पूर्तता, शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी आदी संदर्भातील विद्यालयातील परिस्थितीचा विचार बाजूला ठेवला, तरी माहितीच्या पारदर्शकते-बाबतचा प्रश्न कायम राहतो. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १८ (१)(एफ) या ठिकाणी लागू होत असल्यामुळे, तसेच कलम (४) चा भंग होत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १८ (२) खाली विद्यालयाची अभिलेखव्यवस्था, स्वयंस्फूर्तीने माहिती जाहीर करण्याबाबतची स्थिती, नागरिकांना माहिती देण्याबाबतची परिस्थिती या विषयी शिक्षणसंचालकांनी चौकशी करावी व खातेनिहाय कार्यवाही त्वरित सुरु करावी. आपण करीत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती शिक्षण संचालकांनी राज्य माहिती आयोगाला दि. २०.६.२००७ पर्यंत सादर करावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

ठिकाण :-
दिनांक :- ०५/०५/२००७